**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात जैवइंधन (बायोफ्युएल) जागरुकता व बुद्धीशीलता परिचर्चा
## २२ मे रोजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन

अमरावती -

ग्रीन कृड ॲण्ड बायोफ्युएल फाऊन्डेशन, नागपूर आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक २२ मे, २०१९ रोजी दुपारी २.०० वाजता प्रयोगशील शेतकरी, उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ व स्टार्टअप उद्योजक यांचेकरीता विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात जैवइंधन (बायोफ्युएल) जागरुकता व बुद्धीशीलता परिचर्चा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून प्रमुख वक्ते म्हणून ग्रीन कृड ॲण्ड बायोफ्युएल फाऊन्डेशन, नागपूरचे अध्यक्ष डॉ. हेमंत जांभेकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

इथेनॉल जैवइंधनाचा योग्य प्रमाणात वापर केल्यास ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल, तसेच देशाची आर्थिकस्थिती सक्षम होण्यास मदत होईल. भारतात सरकारच्यावतीने अरबो रुपयाचे पेट्रोल, डिझेल परदेशातून आयात केल्या जाते, त्यामुळे त्याचा प्रचंड ताण भारतीय अर्थव्यवस्थेवर पडतो, हा ताण कमी व्हावा, भारताचा पैसा भारतातच रहावा आणि भारताचा विशेषतः ग्रामीण क्षेत्राचा विकास व्हावा, या महत्तम उद्देशाने जैवइंधन महत्वाचे पाऊल आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जैवइंधन जागरुकता आणि बुद्धीशीलता यावर होत असलेली परिचर्चा अत्यंत महत्वाची आहे.

तरी कार्यक्रमाचा जास्तीतजास्त संख्येने लाभ घेण्याचे आवाहन नवसंशोधन, नवोपक्रम व साहचार्य मंडळाचे संचालक डॉ.डी.टी. इंगोले यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १५/०५/२०१९.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी